रविवार दि.२ मार्च २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

# दैनिक लोकनेता

बीड

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत   संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१६८ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

## मातृतीर्थावर आयोजित बहुचर्चित बहुजन साहित्य संमेलनाचे उदघाटन

# भारत सरकारचे केंद्रीय मंत्री मा.प्रतापराव जाधव यांचे हस्ते

लोकनेता न्यूज नेटवर्क

बुलढाणा । ज्ञानेश्वर बुधवत

सर्वदूर ख्याती प्राप्त बहुजन साहित्य संघ, चिखली, जिल्हा बुलढाणा च्या वतीने, मातृतीर्थ अर्थात मा जिजाऊ यांची माहेर नगरी सिंदखेडराजा येथे दि. ३१ मार्च, २०२५ रोजी आयोजित राज्यस्तरीय सहाव्या बहुजन साहित्य संमेलनाच्या उदघाटनाची जबाबदारी भारत सरकारच्या केंद्रीय मंत्रालयातील आयुष मंत्री
मा. प्रतापराव जाधव यांनी आवर्जून स्विकारली असून ब. सा. संघाचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ साहित्यिक कवी कलावंत आणि समर्पित सामाजिक सेवेसाठी सातासमुद्रापारची मानद डॉक्टरेट प्राप्त डॉ. विजयकुमार कस्तुरे, ॲव्होकेट, चिखली, उपाध्यक्ष तथा ज्येष्ठ साहित्यिक कवी आणि आपल्या परकायाप्रवेशी कथाकथनासाठी साऊथवेस्टर्न अमेरिकन विद्यापीठाकडून मानद डॉक्टरेट प्राप्त डॉ. बबनराव महामुने, छ. संभाजीनगर, यांच्या सह सामाजिक व मानवीय सेवाभावी कार्यास्तव अमेरिकेतील विद्यापीठाकडून मानद डॉक्टरेट पदवीने सन्मानित, ब. सा. संघाचे सचिव डॉ. डी.व्ही. खरात, चिखली, ब. सा. सं. चे सल्लागार तथा संपादक, प्रा. भास्कर इंगळे, बुलढाणा आणि ग्रामीण भागातील मौजे बोरगाव काकडे, ता. चिखली येथील भावकवी म्हणून प्रसिद्ध असलेले तथा ब. सा. सं. चे सह संघटक आयुष्मान अंकुश पडघान यांनी त्या संबंधीचे हार्दिक निमंत्रण पत्र आज दि. २८–०२–२०२५ रोजी मा. मंत्री महोदय बुलढाणा येथे आले असता, जिल्हाधिकारी कार्यालयातील त्यांच्या विशेष कक्षामधे, त्यांना दिले. आणि मा. मंत्री महोदयांनी सुध्दा अत्यंत आनंदाने सदर निमंत्रणाचा स्विकार करून सहर्ष, मातृतीर्थावर संपन्न होत असलेल्या उपरोक्त बहुजन साहित्य संमेलनाच्या उदघाटनासाठी आवर्जून उपस्थित राहण्याचे मन:पूर्वक आश्वासन दिले.



# कु.शर्मिष्ठा बाळासाहेब डोंगरे हिचे नेट परीक्षेत उज्वल यश

लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । अण्णासाहेब साबळे

यूजीसीद्वारे आयोजित NET परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून ॲड.शर्मिष्ठा बाळासाहेब डोंगरे हिने यश संपादन केले आहे.पुण्यातील खड्ड लॉ कॉलेजमधून LLB पूर्ण केल्यानंतर तिने महाराष्ट्र लॉ कॉलेज, पवई येथे LLM प्रथम श्रेणीत पूर्ण केले. तिचे मूळ गाव मांची, ता. संगमनेर असून तिचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण महात्मा फुले कृषी विद्यापीठातील सावित्रीबाई फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात झाले आहे. तसेच पुणे आकाशवाणी आणि अहिल्या नगर ऋ केंद्रावर तिने विविध विषयांवर



विचार मांडले आहेत.
तिच्या या यशाबद्दल महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु डॉ. साताप्पा खरबडे, निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाचे राज्य अध्यक्ष प्रमोददादा मोरे,डॉ.प्रमोद रसाळ,सचिव डॉ.महानंद माने,महेश घाडगे,डॉ.उल्हास सुर्वे,डॉ.ज्ञानेश्वर क्षीरसागर,डॉ.सोपान मोरे,सचिन गाडेकर,मुख्याध्यापक अरुण तुपविहिरे,जितेंद्र मेटकर,मनोज बावा,संतोष जाधव,कार्याध्यक्ष छायाताई राजपूत,सचिव वनश्रीताई मोरे – गुणवरे,सहसचिव संजय गायकवाड,हरिदास शिंदे,आदर्श सरपंच बाळासाहेब ढोले,बाळासाहेब गाडेकर,डॉ.शरद दुधाट,तसेच राज्य प्रसिद्ध प्रमुख 'तथा लोकशाही पत्रकार संघाचे बीड जिल्हा उपाध्यक्ष अण्णासाहेब साबळे यांनी अभिनंदन केले.

# सदानंद कुलकर्णी यांचा निरोप समारंभ देगलुर आगारात उत्साहात संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

देगलूर । मधुकर शिरेवार

देगलूर आगारातील यांत्रिक कर्मचारी श्री सदानंद कुलकर्णी यांचा ३७ वर्षे सेवा केली आहे.सेवानिवृत्तीचा कार्यक्रम देगलूर आगारात संपन्न झाला या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी आगाराचे आगार व्यवस्थापक श्री संजयजी अकुलवार साहेब हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सदानंद कुलकर्णी यांचे बहीण तथाशिक्षिका सौ कुलकर्णी स्मिता योगीराज या उपस्थित होत्या या कार्यक्रमाची रूपरेषा कामगार संघटनेचे कार्याध्यक्ष दिलीप सोनाजी वाघमारे यांनी केली यावेळी प्रशासनाकडून स्मृतीचिन्ह शाल श्रीफळ सदानंद कुलकर्णी यांना श्री आगार प्रमुख यांच्या हस्ते देण्यात



आला त्यानंतर महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेतर्फे सदानंद कुलकर्णी साहेब व त्यांच्या पत्नी यांना कपडे व भेटवस्तू देण्यात आले याप्रसंगी देगलूर आगारातील चालक वाहक यांत्रिक प्रशासकीय व अधिकारी वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होता कार्यक्रम संपल्यानंतर लगेच भोजनाची व्यवस्था सुद्धा करण्यात आली कार्यक्रमादरम्यान त्यांच्या भगिनी सौ कुलकर्णी स्मिता योगीराज यांनी आपल्या भाऊ यांच्या जीवनाचा लेखाजोखा हा कवितेच्या माध्यमातून सर्व कर्मचाऱ्यांच्या पुढे व त्यांच्या पाहुण्यांच्या पुढे वाचन करून दाखविली .

# लालपरी आर्धी रिकामी तरीही आदमपूर फाट्यावर न थांबताच सुसाट



आदमपूर फाट्यावरील प्रवाशी न घेताच सुसाट पुढे मार्गस्थ घेऊन जाणाऱ्या चालक व वाहकावर योग्य कार्यवाही केली जाईल. संजय आकुलवार, आगार प्रमुख देगलुर

लोकनेता न्यूज नेटवर्क

बिलोली । गौतम गावंडे

देगलूर आगाराची एक लालपरी बस हि २८ रोजी दुपारी सव्वा तीन वाजता बसमध्ये अर्धे आसन रिकाम्या असताना देखील बिलोली तालुक्यातील आदमपूर फाट्यावर न थांबताच नांदेडकडे सुसाट धावत गेल्याने येथे थांबलेल्या दिव्यांग सह वयोवृद्ध व महिलांना तेथेच थांबून आसलेल्या खाजगी बसने प्रवास करत अर्थिक भार सोसावा लागला. २८ फेब्रुवारी दुपारी ३ वाजता एक दिव्यांग सह २ महीला व एक वयोवृद्ध पुरुष बिलोली तालुक्यांतील आदमपुर फाटा येथे शासनाने जाहिर केलेलया प्रवासाची सवलतीचे लाभ घेऊन नरसी, नायगाव व नांदेड कडे जाण्यासाठी थांबले होते. जवळपास दुपारी सव्वा तिन वाजता देगलुर आगाराची लालपरी बस क्रमांक एम.एच. २०, बि. एल. १२३० ही साधीबस देगलुरहून नांदेडकडे जाणारी आदमपुर फाट्यावर आली आसता तेथे थांबलेल्या प्रवाशांनी हात दाखवत बस थांबवण्याची विनंती केली असली तरीही सदर बस न थांबवता सुसाट नांदेड कडे गेली. तेंव्हा एक पत्रकार व कांहीं नागरीक तेथेच थांबून असलेल्या खाजगी बसने प्रवास करत शंकरनगर येथे थांबलेल्या सदर बसच्या चालक व वाहकास बस अर्धी रिकामी तरीही का थांबवले नाही असे विचारले असता. समोर खाजगी बस असल्याने थांबवता आले नाही असे आश्चर्यकारक उत्तर दिले. अशा या बेजबाबदार चालक व वाहकावर देगलुर आगर प्रमूख कार्यवाही करतील का? हे पाहणे आता गरजेचं आहे .

# राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) युवक कॉँग्रेसचे जिल्हा सचिव शिवकुमार डाकोरे याचा भाजपमध्ये प्रवेश

लोकनेता न्यूज नेटवर्क

देगलूर । धनाजी जोशी

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यशैलीवर प्रेरित होऊन महाराष्ट्राचे मा मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते व जनार्दन बिरादार यांच्या नेतृत्वाखाली काल नांदेड येथे असंख्य कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत प्रवेश केला यावेळी महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री राज्यसभेचे खासदार श्री अशोकराव चव्हाण साहेब देगलूर बिलोली विधानसभेचे आमदार जितेश अंतापुरकर साहेब भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष श्री संतुकरावजी हंबर्डे साहेब,देगलूर भारतीय जनता पार्टीचे अध्यक्षअनिल पाटील खानापूरकर,शिवाजीराव देशमुख बळेगावकर साहेब,शंकररावजी कांतेवार साहेब,प्रितम देशमुख हाणेगावकर साहेब, युवा नेते जनार्दन बिरादार यांच्या



समवेत अनेक नेते पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.
राष्ट्रवादी युवक कॉँग्रेसचे जिल्हा सचिव शिवा डाकोरे यांनी. सामाजिक राजकीय व सांस्कृतिक आदी कार्यात अग्रेसर राहुन समाजाचे प्रश्न मार्गी लावण्याचे काम केले व पुढे करत राहणार अशी ग्वाही दिली. शिवा डाकोरे यांनी मराठा क्रांती मोर्चा च्यावेळी त्यांनी एक मावळा म्हणून समाजाच्या मांडीला मांडी लावून काम केले. समाजाचे अनेक आंदोलने मोर्चे त्यावेळी त्यांची महत्त्वाची भूमिका बजावली. शिवा डाकोरे हे मराठा समाजाचा एक तरूण चेहरा असून ते भारतीय जनता पक्षाचे जाम जोमाने करून गोर गरीब दिन दुबळ्याचे प्रश्न मार्गी लावण्याचे प्रयत्न करेन असे यावेळी सांगितले असुन भारतीय जनता पार्टीचे काम नव्या जोशाने घरा घरात नेण्याचे सांगितले.




शिवाजीनगर पोलिस स्टेशनचे कर्तव्यदक्ष पोलिस निरीक्षक मा.तांदळे साहेब यांच्यासह सर्व टिमचे आज पोलीस स्टेशन शिवाजीनगर नांदेड येथे आभार मानण्यात आले.श्री गुरू गोविंदसिंगजी विमानतळ नांदेड येथे पासेसची व्यवस्था उपलब्ध करून देत उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घडवून आणण्यासाठी आपल्या स्वतःच्या तीन पोलिस वाहनातून जवळपास १९ दिव्यांगांना ने आन करणारे पोलिस निरीक्षक तांदळे साहेब यांच्यासह जिल्हा पोलिस प्रशासनाचा जयजयकार करण्यात आला (लोकनेता न्युज नेटवर्क नांदेड)

# पुणे-अहिल्यानगर रस्त्यावर लावलाय ट्रॅप, चालकांकडून पैसे घेण्यासाठी वाहतूक पोलिसाची जोरदार वसुली

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**वाघोली । संतोष कदम**



पुणे–अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावर चंदननगर ते वाघोली या दरम्यान वाहतूक कोंडी ही नित्याची बाब झाली आहे. चौकाचौकात वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पोलिसांच्या नेमणुका करण्यात आलेल्या आहेत.मात्र त्याऐवजी ते ये–जा करणारे शेतकरी, नोकरदार व सर्वसामान्य नागरिकांकडून पठाणी वसुली करीत असल्याच्या तक्रारी येत असून वाहतूक विभागातील पोलिसांचे काम वाहतूक नियमन की वसुली असा प्रश्न वाहनचालकांना पडला आहे.

पुणे–अहिल्यानगर महामार्गावरील टाटा गार्डन स्टॉप , चंदननगर स्टॉप , हडपसर बायपास ,खराडी दर्गा , जकात नाका , वाघेश्वर मंदिर चौक, आव्हाळवाडी चौक,केसनंद फाटा यादरम्यान दररोज प्रचंड प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. मात्र, सध्या वाहतूक शाखेचे पोलीस वाहतूक कोंडी सोडविण्याऐवजी ऑनलाईन दंड व पावत्या फाडण्यात दंग आहेत. त्यामुळे नगर , शिरूर , शिक्रापूर , राहू , मांजरी परिसरातून येणाऱ्या दुचाकी, चारचाकी सह अवजड वाहने येणाऱ्या जाणाऱ्यांसाठी डोकेदुखी ठरत आहे. मार्च एन्ड जवळ आल्याने सध्या वाहतूक पोलिसांकडून पुणे–अहिल्यानगर महामार्गावरील चंदननगर ते वाघोली दरम्यानच्या अनेक चौकामध्ये दररोज सर्रासपणे वसुली सुरूच असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. सदरची कारवाई आणि वाहन तपासणी मोहिमेत विना परवाना वाहन चालविणे, कागदपत्रे जवळ नसणे, ट्रिपल सीट, सीट बेल्ट न लावणे, पीयूसी प्रमाणपत्र नसणे आदी नेहमीच्याच सुमार आणि ढोबळ कारणांसाठी ठरलेली ५०० ते १५०० रुपयांपर्यंत पावती फाडत आहेत. त्यातून सामान्यांना मात्र विनाकारण त्रास होत असून राजकीय पक्षाचा लोगो लावलेल्या गाड्या, काळ्या काचा लावलेल्या आणि सर्रास नियमभंग करणाऱ्या उच्चभ्रूंच्या चारचाकी, सरकारी कर्मचारी आणि अधिकाऱ्यांच्या गाड्या अशी वाहने मात्र सहीसलामत पावतीतून सुटत असल्याचा अनेकांचा अनुभव आहे.

दुसरीकडे सर्वसामान्य वाहनधारकांना वाहतुक शाखेचे पोलिस कर्मचारी वाहनांचा फोटो काढून मोठा दंड आकारत आहेत. प्रसंगी अनेक वाहनधारकांना हुज्जत घालून अपमानीत करत आहेत. विशेष म्हणजे यात अनेक वाहनधारकांची कुठलीही चूक नसताना हा आर्थिक फटका त्यांना नाहक सहन करावा लागत आहे. रस्त्यावर एका बाजूला उभे राहून वाहतूक पोलीस सर्वसाधारण वाहनधारकांना हेरुन ते समोर जाताच अचानक त्यांच्या वाहनाचा फोटो काढून मोठा दंड आकारतात असा अनुभव सध्या अनेकांना दररोज येत असल्याचा तक्रारी आहेत.

### वाहतुक नियमनाकडे दुर्लक्ष?

**पुणे–अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावर दैनंदिन छोटे मोठे अपघात होत असतात. रस्त्याची दुरवस्था व वाहतूक कोंडी याचा अगोदरच नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे. त्यातच वाहतूक पोलिसांनी वसुलीचे टार्गेट पूर्ण करण्याच्या नावाखाली वाहतूक नियमनाकडे मात्र सपशेल दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे. वाघोली पोलीस स्टेशनच्या समोरच घोळक्याने उभे असलेले पोलिस रस्त्याच्या मध्यभागी येऊन वाहने अडवत वसुली करत आहेत. त्यातून अनेक वाहनचालकांची घाबरगुंडी उडते आणि त्यांच्या अपघाताची शक्यता वाढते.**



**पेठवडज मध्ये प्रथमच मोलाचे कार्य बालाजी फिल्डवेल सोसायटी च्या माध्यमातून कन्यादांसाठी पाच हजार शंभर रुपये देण्याचे कार्य सौ.सुनीताताई अशोकराव डावकोरे यांच्या माध्यमातून सर्व समाजातील मुलीच्या लग्न कन्यादानासाठी देण्यात येत आहे तरी दि २ मार्च २०२५ रोज रविवारी लग्न होत असलेल्या पूजा आनंदराव पांढरे ही कन्या तिसरी मानकरी ठरली आहे पांढरे परिवाराकडून अशोकराव डावकोरे साहेबांचे आभार मानले आहेत.(लोकनेता न्युज नेटवर्क नांदेड)**

# अट्टल महाविद्यालयाची स्वच्छता वारी; पालख्या डोंगरावरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई । ज्ञानेश्वर उदावंत**






मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या गेवराई येथील र. भ. अट्टल महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी गेवराई जवळील पालख्या डोंगरावर श्री. खंडोबा मंदिराच्या परिसरात स्वच्छता केली. प्राचार्य डॉ. रजनी शिखरे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या उपक्रमात राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. समाधान इंगळे सर, प्रा. अरुण जाधव, प्रा. शरद सदाफुले आणि विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. नुकत्याच पार पडलेल्या यात्रेच्या निमित्ताने मंदीर परिसरात झालेला कचरा, प्लॅस्टिक पिशव्या, बॉटल आदी प्रकारचा कचरा साफ करून त्याची विल्हेवाट लावली. या उपक्रमाबद्दल विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाच्या विकास समितीच्या वतीने तसेच महाविद्यालयाचे प्रशासन आणि प्राध्यापकांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

# हिंगोली जिल्ह्यातील इ १०वीच्या ५४ परीक्षा केंद्रावर इंग्रजी विषयाचा पेपर पार पडला

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिंगोली । महादेव हरण**



हिंगोली जिल्ह्यातील ५४ परीक्षा केंद्रावर आज दिनांक १/०३/२०२५ रोजी इंग्रजी विषयाचा पेपर पार पडला असून या१०वीच्या इंग्रजी विषयाला एकूण विद्यार्थ्यांची संख्या१५८७७ तर उपस्थिती १५५३८ विद्यार्थी उपस्थित होते तर अनुपस्थित विद्यार्थी ३३९ उपस्थितीचे प्रमाण ९७.८३% राहिले असून विभागी मंडळाने नेमलेले चार भरारी पथक व मा ,जिल्हा अधिकारी यांनी नेमलेल्या भरारी पथकाने परीक्षा केंद्रावर भेटी दिल्या ५४ परीक्षा केंद्रावर बैठे पथक नियुक्त करण्यात आले होते प्रत्येक परीक्षा केंद्रावर पोलीस बंदोबस्त असून परीक्षा केंद्रावर प्रश्न पत्रिका व उत्तरपत्रिका ने आन करणाऱ्या सहाय्यक परीक्षकासोबत पोलीस कर्मचारी देण्यात आले होते तर जिल्ह्यात आज पेपर सुरळीत पार पडला आहे.

# मा.चंद्रशेखर बावनकुळे भाजपा प्रदेशाध्यक्ष यांनी केले पेठवडज येथील गोविंद केंद्रे यांचे अभिनंदन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आंबुलगा । सुर्यभान बिजलगावे**

पेठवडज येथील गोविंद केंद्रे भाजपा जेष्ठ पद्धाधिकारी, (मुखेड – विधानसभा) भारतीय जनता पार्टीच्या संघटनपर्वामध्ये गोविंद केंद्रे यांनी १००० सदस्य नोंदणी करून त्यांना भारत देशाच्या पुनर्निर्माणाच्या प्रवासात सहभागी करून घेतल्याबद्दल मा.चंद्रशेखर बावनकुळे भाजपा प्रदेशाध्यक्ष यांनी गोविंद केंद्रे यांचे अभिनंदन केले आहे.

भाजपाचे अंत्योदयाचे धोरण जनमानसात घेऊन जात आहोत. यातून आपली लोकांप्रती असलेली बांधिलकी आणि पक्ष विचारांप्रती असलेली निष्ठा अधोरेखित होते.म्हणून या समर्पित





योगदानाबद्दल पक्षाध्यक्ष म्हणून मला आदर आणि अभिमान वाटतो.आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वात भारताची मान जगभरात उंचावली आहे, तर आपले आदरणीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र थांबणार नाही, याची सर्वांना खात्री आहे.संघटनपर्वात किमान एक हजार सदस्य भाजपा सोबत जोडून तुम्ही संघटना बळकट केलीच आहे, शिवाय महाराष्ट्राच्या विकासासाठीचे दूतही आपण जोडून घेतलेले आहेत.त्यांच्या या योगदानाबद्दल मनःपूर्वक अभिनंदन मा.चंद्रशेखरजी बावनकुळे भाजपा प्रदेशाध्यक्ष, महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री नागपूर व अमरावती जिल्हा यांनी केले आहे.सर्व स्तरातून गोविंद केंद्रे यांचे कौतुक केले जात असून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# अतिक्रमण हटाव मोहिमेमुळे सीओंचे नागरिकांकडून कौतुक

## ताकडगाव रस्त्याचे अतिक्रमण काढावे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई । ज्ञानेश्वर उदावंत**



शहरातील ताकडगाव रोड हा नविन गेवराईचा मुख्य रस्ता असून या भागात शाळा,क्लासेसमुळे विद्यार्थी नागरिकांची मोठी वर्दळ असते.मात्र या भागातील नागरिकांनी रस्त्यावर अतिक्रमण केल्याने वाहातुकीची मोठी कोंडी होती.येथे उतार असल्याने अनेकदा अपघातही घडले आहेत . मुख्याधिकारी तथा प्रशासक विक्रम मांडुरके यांनी येथील अतिक्रमण काढुन या भागातील नागरिकांचा दबलेला श्वास मोकळा करावा, अशी ताकडगाव रोडवरील रहिवाशांची मागणी होत आहे.

ताकडगाव रोडच्या मुख्य रस्त्यावर दुतर्फा अतिक्रमण धारकांनी जागा धरून आपापले व्यवसाय रस्त्यावर थाटले आहेत.तर काही प्लॉट धारकांनी अतिक्रमण करून गाळे किरायाणे दिले आहेत. त्यामुळे येथे नेहमीच रस्त्यावर वाहनांची कोंडी होऊन अनेकदा अपघात घडले आहेत . येथे नाश्ताचे हॉटेल , ऑनलाईन टायपिंगच्या दुकाना, स्टेशनरी ,मेडिकल , झेरॉक्स सेंटर असल्याने येथे अनेक अपघात होवून या अपघातातून अनेकांचे जीवही गेलेले आहेत . परंतु हे अतिक्रमण उठवण्याचे धाडस आजपर्यंत कोणीही केले नाही .मात्र नगरपालिकेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक विक्रम मांडूरके यांनी लक्ष घालून मुख्य रस्त्यावर चौकात असलेले अतिक्रमण काढण्याची मोहीम हाती घेतलेली असुन त्यांच्या या भूमिकेचे सर्वत्र स्वागत होतआहे . नविन गेवराईचा मुख्य रस्ता असलेला ताकडगाव रोडचे अतिक्रमण'' जैसै थै ''आहे. या भागात शाळा महाविद्यालये, कॉलनी व क्लासेस मोठ्या प्रमाणावर आहेत. या भागात विद्यार्थी व नागरिकांची मोठी वर्दळ असते.येथील अतिक्रमणामुळे मोटार सायकल, फोर व्हिलर रस्त्यावरच लावल्या जातात .यामुळे येथे वाहतुकीची कोंडी होते. जाणाऱ्या – येणाऱ्या नागरिकांना आपला जीव मुठीत धरून चालावे लागते.आज पर्यंत येथील अतिक्रमण काढण्याची हिंमत कुणी केली नाही .मुख्य रस्त्या लगत असलेला जालना –बीड रोड चा गुदमरलेला श्वास मोकळा झाल्याने मुख्याधिकाऱ्यांचे स्वागत शहरातील नागरिकांनी केले आहे. मात्र ताकडगाव रस्त्या वरीलअतिक्रमण काढण्याची ही कारवाई पूर्णपणे करावी . कोणच्याही दबावाला मुख्याधिकाऱ्यांनी बळी न पडता हे अतिक्रमण पूर्णपणे जमीन दोस्त करावे, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# कुंडलवाडी पोलिसांची धडक कारवाई; मोठ्या प्रमाणात गुटखा जप्त

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**



कुंडलवाडी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे यांनी लाखो रुपयांचा अवैध गुटखा स्विफ्ट कार एम.एच. २६ ए.जे. ८०९६ गाडी मधुन घेऊन जाताना कार चालकाला पकडून त्याला ताब्यात घेऊन मोठी कारवाई केल्यामुळे अवैध धंदे करणाऱ्याचे धाबे दणाणले असल्याचे चर्चा कुंडलवाडी शहरात होताना ऐकावयास मिळत आहे.दि. १ मार्च २०२५ रोजी दुपारी ठिक :१२:३० वाजता बिलोली कडून कुंडलवाडी शहराकडे येणाऱ्या स्विफ्ट कार एम.एच. २६ ए.जे. ८०९६ गाडी मधुन अवैधरित्या गुटखा घेऊन जात असल्याची खात्रीशीर माहिती एका गुप्तचराकडून मिळाल्यामुळे कुंडलवाडी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे यांनी क्षणाचा ही विलंब न करता तात्काळ आपल्या कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन दुपारी १२:३० वाजताच्या दरम्यान शहरातील चुंगी नाका येथे आपल्या कर्मचाऱ्यांसोबत येऊन थांबले असता. अवैधरित्या गुटखा घेऊन येणाऱ्या स्विफ्ट डिझायर वाहनाला थांबवून त्या कारची चौकशी केली असता कार मध्ये अवैध गुटखा आढळून आला. त्यानंतर चालकाची विचारपूस केली असता. कुठून गुटखा आणत आहात. यावेळी कार चालकाने बिलोली येथील इनामदार गल्ली येथून गुटखा खरेदी केल्याची माहिती दिल्याबरोबर तात्काळ कुंडलवाडी पोलिसांनी घटनास्थळी जाऊन गोदाम मालक शेख फिरोज यांच्या पडक्या घरातून लाखो रुपयांचा गुटखा जप्त केल्यामुळे अवैधरित्या गुटखा विक्री करणाऱ्या धंदेवाल्याचे धाबे दणाणले आहे. गुटखा विक्री करणाऱ्या शेख वाजीद मंजुर, अहमद वय ३६ वर्ष रा.गुंठागल्ली धर्माबाद ता.धर्माबाद जि.नांदेड गोदाम मालक अब्दुल फिरोज अब्दुल वहाब रा. ईनामदार गल्ली बिलोली ता. बिलोली जि.नांदेड यांचा विरुद्ध गुन्हा.रजि.नंबर २७/२०२५ कलम १२३,२२३,२७५, भारतीय न्याय संहिता व सहकलम अन्न सुरक्षा मानके कायदा कलम २००६ चे कलम २६ (२) (१),२६ (२)(४),२७ (३) (ई),३ (१) (झेड) (४),३० (२) सह कलम ५९ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून हि कारवाई श्री.अबिनाश कुमार, पोलीस अधिक्षक, नांदेड श्री सुरज गुरव, अप्पर पोलीस अधिक्षक, नांदेड श्री खंडेराव धरणे, अप्पर पोलीस अधिक्षक, भोकर गोसावी,उप विभागीय पोलीस अधिकारी,उपविभाग देगलुर चार्ज धर्माबाद यांच्या मार्गदर्शना खाली कुंडलवाडी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे, पोहेकॉ / २२१२ माधव पाटील, पोकॉ/ रामेश्वर पाटील ब.नं २१०४ रामेश्वर पाटील, पोकॉ/१८७६ रघुवीरसिंह चौहान, होमगार्ड ब.नं २०२० अंकुश ईरेवाड, होमगार्ड ब.नं ६२५ ईस्माईल पठाण, होमगार्ड बनन २०१६ महेश आदमनकर, होमगार्ड ब.नं २५०७ आकाश गायकवाड, होमगार्ड ब.नं.२२४२ ज्ञानेश्वर रामपुरे, होमगार्ड बनन ६४५ शेख गौस, होमगार्ड ब.नं ५३७ लिंगुराम गुरुपवार, महीला होमगार्ड ब.नं २६१५ सुप्रिया बोलचेटवार या टिमने कारवाई केली आहे.

# नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील आजी माजी सरपंच उपसरपंच,सोसायटी चेअरमन,ग्रा.प.सदस्य यांचा शिवसेनेत पक्ष प्रवेश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड | गौतम बनसोडे**







शिवसेनेचे मुख्यनेते तथा राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री मा.ना.श्री.एकनाथजी शिंदे साहेब यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील डेरला,मार्कंड ,वाहेगाव,कल्हाळ,भनगी, पांगरी,पिंपळगाव(निमजी),खुपसरवाडी,विष्णुपुरी,धनगरवाडी या सह अनेक गावातील आजी–माजी सरपंच–उपसरपंच,सोसायटी चेअरमन,ग्रा.प.सदस्य यांनी आ.आनंदराव पाटील बोंढारकर,आ.हेमंतभाऊ पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केलेल्या कार्यक्रमात शिवसेना पक्षामध्ये प्रवेश केला या कार्यक्रमाला नेते तथा मंत्री विधानपरिषद गटनेते आमदार ना.हेमंतभाऊ पाटील,आ.आनदराव पाटील बोंढारकर,जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे,तालुकाप्रमुख अशोक मोरे,शहरप्रमुख तुलजेश यादव,शहरप्रमुख सुहास खराणे, सुदिन बागल,मारोतराव धुमाळ,तुकाराम पवार,सचिन पवार,स.रोशनसिंघ जाहगीरदार यांच्यासह आदी उपस्थित होते.

यावेळी डेरला येथील सरपंच कामाजी कदम , मार्कंड येथील सरपंच आकाश येवले, वाहेगाव येथील सरपंच शंकरराव सोनटक्के , कल्हाळ येथील सरपंच विठ्ठल कळके , भनगी येथील सरपंच गोविंद मोरे, पांगरा येथील सरपंच हनुमंत घोगरे, झरी येथील सरपंच विलास रिंगे, पिंपळगाव ( निमजी ) येथील सरपंच चांदू डक, खुपसरवाडी येथील सरपंच शेख महमूद , वाहेगाव माजी सरपंच लोभाजी गवारे, विष्णुपुरी माजी सरपंच संतोष बारसे, ग्रा. प. सदस्य खुपसरवाडी बालाजी आचमे, धनगरवाडी उपसरपंच साहेबराव कांबळे, ग्रा. प. सदस्य डेरला राजू शिंदे , माजी सरपंच डेरला विठ्ठल सोळंके, वाहेगाव चेअरमन खंडोजी सोनटक्के, ग्रा. प. सदस्य वाहेगाव गणेश ठाकूर, ग्रा. प. सदस्य वाहेगाव माधव घोरपडे, उपसरपंच वाहेगाव दिलीप कंधारे, सोसायटी संचालक वाहेगाव सुभाष सोनटक्के, सोसायटी संचालक वाहेगाव आकाश घोरपडे, भनगी सोसायटी उप चेअरमन दशरथ देशाई , ग्रा. प. सदस्य भनगी पांडुरंग मोरे, ज्ञानोबा कंधारे, संजय कंधारे, सिद्धार्थ गवारे, शिवाजी कळके, दिगांबर कंधारे, बजरंग कंधारे, मारोती भारगे, गोविंद गंदेवार, माधव पवार, गजानन कोकाटे, मारोती कळके, बापूसाहेब जाधव, वैजनाथ कदम, माधव कदम, गजानन धुमाळे, विश्वनाथ पवार, नागेश हिवंत, नरहरी डक , मारोती कदम, वैभव कदम संजय कदम, अनिल धुमाळे, साईनाथ शिंदे, सुरेश पुंड, तुकाराम मोरे, सदाशिवराव डक, सुभाषराव डक, भनगी माजी उपसरपंच विनायक मोरे, कैलाश कळके, गंगाप्रसाद भोरगे, सतीश क्षीरसागर, मधुकर कळकेकर , प्रकाश भोरगे, विजय कळके , ज्ञानेश्वर क्षीरसागर, रंगनाथ क्षीरसागर, राजू कळके , चंद्रकांत क्षीरसागर, मारोती भोरगे, साईनाथ कळके , शिवाजी कळके , सोसायटी संचालक वाहेगावपुंडलिक सोनटक्के, माजी सरपंच वाहेगाव संजय कंधारे, दत्ता पातरफळे, मारोती शिंदे, माधव कदम, मारोती कदम, कोंडीबा पवार, राजू कदम, गुलाब शिंदे, राजाराम कदम, लक्ष्मीकांत जाधव, विकास जाधव यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसेना पक्षात प्रवेश केला व हिंदूहृयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या शिकवणीनुसार ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण करत नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील जनतेची सेवा करण्याचे वचन दिले या पक्ष प्रवेश सोहळ्याला परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कंधार तालुक्यात उन्हाचा पारा वाढला अन् कूलरचा गारवा महागला!

**बँडेड कूलर महाग**

**कुलरमध्ये त्याच्या दर्जाला महत्त्व असते. ब्रँडेड वस्तू शक्यतो वर्षभर बिघडत नाहीत.त्याची वॉरंटी विक्रेत्यांकडून मिळू शकते.मात्र,ते थोडे महाग असतात.नामवंत कंपन्यांच्या कूलरची किमंत ६ ते २२ हजार रुपयांपर्यंत असल्याचे दिसून येते.**




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार | धोंडीबा मुंडे**

कंधार तालुक्यात उन्हाळा सुरू होण्या अगोदरच पारा ३४ अंशाच्या पुढे सरकण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे कुलरचा गारवादेखील महागल्याचे दिसत आहे. तापमान वाढू लागल्याने कुलरच्या कंपन्याकडे ठोक विक्रेत्यांकडून अधिकची मागणी होत आहे. नागरिकांकडून कुलरची खरेदी होत आहे. मागील वर्षीच्या तुलनेत यंदा कुलरच्या किमतीत ८ ते १० टक्के वाढ झाली आहे. नामांकित कंपनीच्या कुलरसोबत स्थानिक उत्पादकांच्या कुलरची मागणीही वाढली आहे.

कूलर मुख्यतः दोन स्वरूपात असतात. मेटल आणि फायबर अशा स्वरूपावर त्यांची किंमत निश्चित होते. छोटा पर्सनल कुलर,टॉवर कुलर, विंडो कुलर असेही आणखी काही उपप्रकार यात येतात. डिझर्ट कुलरची बॉडी पत्र्यांची असते. फायबर कुलरची बॉडी प्लास्टिकपासून बनलेली असते. पत्र्यांचे कुलर जास्त गारवा देतात. पण त्याचा पत्रा कुजून जाण्याची शक्यता असते. त्यामुळे प्लास्टिक कुलरकडे ग्राहकांचा ओढा असतो.आता तर यावर्षी बाजारा सध्या नवनवीन कुलर उपलब्ध झाल्याचे दिसत आहे. पुढील उन्हाळ्याचे कडक दिवस लक्षात घेता आता पासुनच खरेदीसाठी व्यापारी आणि ग्राहकांची तयारी दिसत आहे. मुस्लिम बांधवांचा रमजान महिना कडक उन्हाळ्यात म्हणजे मार्चमध्ये येत असल्याने यादिवसांत कूलरला अधिक मागणी असते.

# सिंदखेड राजा येथे धर्मवीर संभाजी महाराज यांच्या बलिदान मास दिनानिमित्त अभिवादन




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा | प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजीनगर टी पॉइंट येथे दिनांक ०१/०३/२०२५ रोजी साडे ५ वाजेच्या सुमारास धर्मवीर संभाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन आणि स्मरण करण्यात आले. मातृतिर्थ सिंदखेड राजा येथे पहिल्यांदाच धर्मवीर संभाजी महाराज यांचा बलिदान मास पाळला जात गेला.

मराठा व सर्व समाजातील रयतेला या पराक्रमी शिवपुत्राचे अंत्यदर्शन ही घेता आले नाही,त्यांचे अंत्यसंस्कार योग्यरित्या करता आले नाही. त्या भावनेतून हा बलिदान मास पाळला जातो. स्वतःच्या शरीराला क्लेश करून आपल्या राजाला या ठिकाणी सर्वांनी अभिवादन केले. धर्मवीर संभाजी महाराज यांचे जीवन प्रत्येकांसाठी जीवन जगण्यासाठी दिशा देणारे आहे. तरुणांतील वाढते नैराश्य, वाढती व्यसनाधीनता कमी करणे हे यंदाच्या धर्मवीर बलिदान मासचा उद्देश आहे.

धर्मवीर बलिदान मासाची सुरुवात जिजाऊ भक्त आणि शिवभक्तांच्या हस्ते झाली. या कार्यक्रमाला मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक तथा छावा जिल्हाध्यक्ष अशोक राजे जाधव, शिवजयंती जन्मोत्सव समिचे अध्यक्ष चंदूभाऊ साबळे, राजेंद्र आढावा मा. नगरसेवक, शिवा दादा पुरंदरे जिल्हाध्यक्ष महाराष्ट्र नवनिर्माण विसेना,वैजनाथ कुडे मा सरपंच, दिनकर जाधव,अमोल जाधव,दिगंबर शिंदे,कैलास देवरे,अशोक कुडे, रफीक पाटील, अर्जुन जाधव मनविसे शहरअध्यक्ष, अनिल कुमार,गजानन खरात यांच्यासह मोठ्या संख्येने शिवभक्त उपस्थित होते.

# आ.आनंदराव पा.बोंढारकर यांच्या हस्ते गुरुद्वारा भागातील भाटिया जनरल स्टोअर्स ते यात्री निवास रोडच्या कामाचे भूमिपूजन संपन्न



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड | बाजीराव पाटील गायकवाड**

नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार आनंदराव पाटील बोंढारकर साहेब यांच्या हस्ते नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील गुरुद्वारा भागातील भाटिया जनरल स्टोअर ते यात्री निवास रोडच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले..याप्रसंगी मा.नगरसेवक स.गुरमीतसिंघ (डिंपल) नवाब,अमितसिंह तेहरा,धीरज यादव,सुमित मुथा, शिवसेना सहसंपर्कप्रमुख स. दर्शनसिंघ सिध्दू, शहरप्रमुख तुलजेश यादव, स.महिंदरसिंघ लांगरी,स.इंदरसिंघ शाहू, स.लड्डूसिंघ कटगार,स.गुरसिमरनसिंघ सरदार,युवासेना जिल्हाप्रमुख आमोद साबळे,श्याम पाटील वानखेडे,स.रोशनसिंघ जागीरदार, सचिन पवार यांच्यासह अनेक कार्यकर्ते पदाधिकारी नेते उपस्थित होते.

# राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाचा माहुर येथे श्री गणेशा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**माहुर | राजकिरण देशमूख**




> **ग्रामीण रुग्णालय माहुर येथे महाडायलेलिस सेंटर ची सुरूवात झाली आहे तेव्हा ज्या रुग्णांना डायलिसिस उपचारांची गरज आहे अशा रुग्णांनी येथे उपचार घ्यावेत**
> **–डॉ किरणकुमार वाघमारे वैद्यकीय अधिक्षक माहुर**

राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत ० ते १८ वयोगटातील बालकांची विशेष आरोग्य तपासणी दि १ ते ३१ मार्च या कालावधीत राबविण्यात येणारा कार्यक्रम माहूर तालुक्यातील सर्व सोयी–सुविधायुक्त असलेल्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची अनु.जाती मुलींची शासकीय निवासी शाळे पासुन शुभारंभ करण्यात आला असुन सदरील मोहिमे अंतर्गत दि.१ ते ३१ मार्च दरम्यान तपासणी करण्यात येणार आहे

महाराष्ट्र शासनाच्या राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम राज्यस्तरावर उपमुख्यमंत्री अजित पवार व आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते ऑनलाईन प्रणाली द्वारे विशेष तपासणी मोहीमेचे पुणे येथे उदघाटन करण्यात आले. त्या अनुषंगाने तालुकास्तरावरील मोहिमेचा श्री गणेश हा शहरातील अनु.जाती मुलींची शासकीय निवासी शाळा येथुन सुरूवात करण्यात आला असुन सदरील मोहित ० ते १८ वयोगटातील अंगणवाडी व शाळेतील मुला मुलींची विनामूल्य तपासणी व जन्मजात अजार व इतर आजारांवर मोफत उपचार संदर्भ सेवा व मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे या वेळी रुग्णकल्याण समिती सदस्य), अनिल वाघमारे, गजानन भारती ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.किरण्कुमार वाघमारे व शाळेचे मुख्याध्यापक सचिन जोशी यांच्या हस्ते करण्यात आली व शाळेतील सर्व उपस्थित विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली सदर कार्यक्रम मोहीमेत राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम पथकामधील डॉ. अभिजित आंबेकर, डॉ. वसीम जावेद,डॉ. श्रीदेवी मुनगीलवार, डॉ. कुलसुम फातेमा, सिंकदर राठोड, श्रीमती अश्विनी पातुरकर, श्रीमती महादाबाई येवले यांनी आरोग्य तपासणी केली. तसेच शाळेतील कर्मचारी सुदेवाड, राठोड श्रीमती आदे मॅडम, श्रीमती कापसे मॅडम, श्रीमती डोंगरे मॅडम व श्री विकास शिंदे सर यांनी सहकार्य केले.

# आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या कडे भोपाळवाडी फाटा येथील रस्ता दुरुस्त करून देण्याची नागरिकांची मागणी



## गीट्टी उडून अनेक जणांचे फुटतात डोके म्हणून रस्ता करा मायबाप

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड | गोविंद मोरे**

नांदेड बिदर हायवे रस्त्यावरील कलंबर खुर्द पासून जवळच असलेल्या भोपळवाडी फाटा श्री छत्रपती संभाजी महाराज चौक येथील कंधार जाणारा रस्ता अत्यंत खराब झाला असून या ठिकाणी परिसरातील २५ ते ३० गावाच्या बाजारपेठेचे मुख्य ठिकाण आहे दर शनिवारी आठवडी बाजार सुध्दा भरतो .उदगीर आगाराची बस बाहेरून बायपास ने जात आहे तसेच कंधार आरागाराची बस सुद्धा बाहेरूनच जात असल्यामुळे वृद्ध नागरिक महिला बालक, व्यापारी, कर्मचारी ,विद्यार्थी ,विद्यार्थिनी यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे . त्या बस गाड्या कलंबर फाटा किंवा संगुचीवाडी फाटा येथे थांबत आहे.त्यामुळे लोकनेते आ.प्रतापराव पाटील चिखलीकर साहेब कंधार लोहा विधानसभा सदस्य यांच्याकडे कलंबर परिसरातील नागरिकांनी भोपळवाडी फाटा श्री छत्रपती संभाजी महाराज चौक ते नांदेड बिदर हायवे बायपास कंधार रोड .गीट्टी फोडून ठेवली असून ती गीट्टी उडून अनेक जणांचे डोके फुटले आहेत ,जीवित हानी होण्याची दाट शक्यता आहे कलंबर खुर्द भोपाळवाडी फाटा व परिसरातील ग्रामस्थांनी निवेदन देऊन माननीय आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर साहेबांना होईल तितके लवकर या रस्त्याची दुरुस्ती करून देण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

# धर्मभुषण ॲड.दिलीप ठाकूर 'लायन्स एप्रिसिएशन' व शिवरत्न पुरस्काराने सन्मानित

लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड । बाजीराव पाटील गायकवाड






वर्षभरात ३६५ दिवस चालणाऱ्या तीन उपक्रमासह एकूण ९० उपक्रम चालवून समाजसेवेचा एक आगळावेगळा पायंडा पाडणारे धर्मभूषण ऍड.दिलीप ठाकूर यांना नुकतेच लायन्स एप्रिसिएशन पुरस्कार तसेच शिव रत्न पुरस्कार हे दोन पुरस्कार मिळाले असून त्यांच्या पुरस्कारांची संख्या ९४ झाल्यामुळे त्यांचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे. सिंफनी च्या सभागृहात झालेल्या प्रेम कुंभ या शानदार समारंभात लायन्स प्रांतपाल गिरीश सिसोदिया उपप्रांतपाल राहुल औसेकर यांच्या हस्ते लायन्स एप्रिसिएशन अवार्ड हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. शाल, आकर्षक स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन दिलीप ठाकूर यांचा सन्मान करण्यात आला.यावेळी पूर्व प्रांतपाल जयेश ठक्कर, दिलीप मोदी, नारायणदास कलंत्री, ड. प्रवीण अग्रवाल तसेच माजी राज्यमंत्री डी.पी. सावंत, प्रा.रवि शामराज, योगेश जायस्वाल यांची प्रमुख उपस्थिती होती.संयोजक रिजन चेअरमन रवि कडगे यांनी दिलीप ठाकूर यांच्या सातत्यपूर्ण सेवा कार्यामुळे त्यांची पुरस्काराची निवड करण्यात आल्याची माहिती आपल्या प्रास्ताविकातून दिली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्योती जांगिड व डॉ.विजय भारतीया यांनी तर आभार प्रदर्शन शिवा शिंदे यांनी केले.

शिव जन्मोत्सवा निमित्त छावा श्रमिक संघटनेच्या या वतीने दिलीप ठाकूर यांना ' शिव रत्न ' हा पुरस्कार भास्कर हंबर्डे व अविनाश कदम यांच्या हस्ते वितरित करण्यात आला. यावेळी सुरेश शर्मा, शिवा लोट यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी भास्कर हंबर्डे यांनी दिलीप ठाकूर यांच्या वेगवेगळ्या उपक्रमाची माहिती देऊन कौतुक केले. शाल, पुष्पहार, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र देऊन दिलीप ठाकूर यांचा सन्मान करण्यात आला.

दिलीप ठाकूर यांना यापूर्वी अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. त्यामध्ये धर्मभूषण पदवी, महाराष्ट्र रत्न, मराठवाडा भूषण, शान ए नांदेड,देवदूत उपाधी,कर्मयोगी पुरस्कार,नांदेड के सांता,इन्स्पायर पर्सनॅलिटी अवॉर्ड,ज्योतिष्य महर्षी पाराशर स्मृती पुरस्कार, गुनिजन गौरव पुरस्कार, सन्मान पुरस्कार, कार्य गौरव पुरस्कार, बेस्ट सिग्नेचर ऍक्टिव्हिटी, कोरोना सेवा योद्धा पुरस्कार, इंटरनॅशनल ह्यूमन राइट्स कमिशन नॅशनल अवार्ड,तिरंगा गौरव पुरस्कार,अखंड सेवावृत्ती पुरस्कार,कोरोना योद्धा, कार्य सन्मान पुरस्कार, कोरोना योद्धा सन्मान, दिनबंधू सेवा पुरस्कार, कोविड योद्धा, समाजभूषण पुरस्कार, अन्नपूर्णा प्रेरणा रत्न पुरस्कार, आदर्श शिवसैनिक पुरस्कार, राजपूत भूषण पुरस्कार, मा जिजाऊ रत्न पुरस्कार, समाज विभूषण पुरस्कार, राजे छत्रपती शिवाजी सेवाभावी पुरस्कार, मातोश्री गंगुबाई पुरस्कार, जीवन साधना पुरस्कार, भगत नामदेव लाइफटाइम अचीवमेंट पुरस्कार, रेअर अवॉर्ड, कानडा राजा पंढरीचा राष्ट्रीय अनुग्रह पुरस्कार, लायन्स बेस्ट प्रोजेक्ट इंटरनॅशनल अवॉर्ड, सेवा सादगी सदाचार पुरस्कार, मानवता रक्षक पुरस्कार, ऊर्जा गौरव पुरस्कार, कार्य अभिमान पुरस्कार, कृतज्ञता सेवा पुरस्कार, राजरत्न पुरस्कार, संवेदनशील सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार, कृतज्ञता उत्सव,मानवता के सेवक पुरस्कार, कोरोना योद्धा गौरव ,इंटरनॅशनल इन्स्पायरिंग आयकॉन अवॉर्ड, आज का कर्मवीर यासारख्या पुरस्कारांनी देशभरातील विविध संस्थांनी गौरव केलेला आहे. पुरस्कार मिळाल्यामुळे आपली योग्य दिशेने वाटचाल होत असल्याची प्रचिती येत असून आणखी कार्य करण्याची ऊर्जा मिळते या शब्दात दिलीप ठाकूर यांनी संयोजकांचे आभार व्यक्त केले. ९४ पुरस्कार मिळाल्यामुळे दिलीप ठाकूर यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# याच्यासाठी त्याच्यासाठी,नुसताच पळत होता ते गेले घरी निघून,हा एकटाच जळत होता..

लोकनेता न्यूज नेटवर्क

मालेगाव । संदीप कदम



जिवनाचा खरा अर्थ कळायचा असेल तर स्मशानात चक्कर मारली पाहीजे,कारण स्मशानभूमीत प्रेत एकटेच जळत होते ते पाहून असंख्य प्रश्नांनी मनात एकच गदारोळ उत्पन्न केला होता.हेच ते प्रेत जिवंत असताना माझेमाझे करत असेल, एक एक रुपयासाठी झगडत असेल, मोह – माया – काम – क्रोध – मत्सर यांना घेऊन समाजात जगत असेल, आरे ला कारे करणारा देह , आज मात्र जळतोय शांत, स्तब्ध, एकाकी तरीही शांतपणे पडून स्वतःला जाळून घेतोय.जीवलगांनी त्यांच्यासाठी जीव लावला. ते आज ओक्साबोक्षी रडले. घरा पासून स्मशानभूमी पर्यंतच सोबती झाले–खरे; परंतु विधी संपताच त्यांनी घराचा रस्ता धरला. घरी जाऊन त्यांनी सुद्धा कडू घास काढण्यासाठी दोन चार घास पोटात घातले असतील, आज दोन चारघास पण उद्या पासून पोटभर अन्न खातील ते.

जमवलेल्या लाखो रूपयाच्या संपत्तीपैकी फक्त फुटका रूपया मुखात आलाय, जीवनात १०० एकर जमिनीच्या तुकड्याला खरेदी केले, तरीही जाळायला नेले स्मशानभूमीतील एकाकी घाटावर, अलिशान बंगल्यामध्ये छानसा सुंदर तयार केलेला बाथरूम, तरीही शेवटची आंघोळ ही त्यात नव्हती, तर ती होती फक्त आणि फक्त घरा समोरील रस्त्यावर आयुष्यभर ज्या साठी झगडला, त्यातील एक गोष्ट सुध्दा बरोबर नव्हती.जळताना – ना प्रेम करणारे जिवलग, ना नातेवाईक, ना सगे सोयरे, ना करोडोची संपत्ती. अरे अरे.... तरीही तो आयुष्यभर खोट्या गोष्टीचा मोह धरून पळत राहिला.... ही खंत तर नसेल वाटत त्या जळणा–या प्रेताला...? समाज बंधुंनो....! आत्मप्रौढी, स्वतःचा मोठेपणा, दुस–याबाबत आकस, समोरच्याला कमी लेखण्याची हीन मनोवृत्ती, गर्वाची भाषा, अहंपणाचा महामेरू ही जीवनातील –हासाची कारणे सोबत असतील तर जीवन कदापि सुंदर होणार नाही.चला.... जीवन सुंदर बनविण्यासाठी काम– क्रोध–लोभ– मत्सररूपी लक्षणांना दूर ठेऊन जीवनात किती ही मोठेपद, प्रतिष्ठा, यश मिळाले तरी अहंकार रूपी सैतानाला दूर ठेऊ या....प्रेमळ–आनंदी–सर्वांचा आदर–आधार......म्हणून माणूस बनू या....!

# हदगाव शहरातील कामाची चौकशी करण्याच्या संबंधित विभागाला आ.बाबुराव कदम यांच्या सूचना

लोकनेता न्यूज नेटवर्क

हदगाव । प्रतिनिधी



हदगाव नगरपरिषद हद्दीतील विकास कामे अत्यंत निकृष्ट झाली असल्याच्या नागरिकांच्या तक्रारींची दखल घेऊन आमदार बाबुराव कदम यांनी मुख्याधिकारी व अभियंत्यांना गंभीरतेने घेऊन सूचना केल्या आहेत सदर कामांची योग्य ती चौकशी करून निकृष्ट दर्जाची कामे होणार नाहीत याची दखल घेण्यास सांगितले. आणि निकृष्ट दर्जाच्या कामांची देयके थांबवून अंदाजपत्रकानुसार काम करून घेतल्यानंतरच देयके देण्यात यावेत व यापुढे निकृष्ट कामे होत असल्याचे निदर्शनास आल्यास खपवून घेतले जाणार नाही अशी ताकीद सुद्धा दिली.

हदगाव शहरात अनेक रस्त्याची कामे नाल्यांची कामे अत्यंत निकृष्ट झाले आहेत अशा तक्रारी नागरिकांनी लोकप्रतिनिधी या नात्याने आमदार बाबुराव कदम यांच्याकडे केले आहेत. नागरिकांच्या या तक्रारीची गंभीर दखल घेत आमदार कदम यांनी मुख्याधिकारी यांच्यासोबत याविषयी चर्चा केली. मागील वर्षी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे असताना हदगाव शहरात मोठ्या प्रमाणात विकास कामासाठी निधी आणला. तसेच शासनाच्या नियमित धोरणाप्रमाणे सुद्धा मोठ्या प्रमाणात विकास कामांचा निधी आलेला आहे अनेक कामे मागील दोन वर्षांपासून सुद्धा प्रगतीपथावर आहेत. या कामांचा दर्जा अत्यंत निकृष्ट असून काम पूर्ण होण्याअगोदरच झालेल्या कामाची वाताहात होत आहे. हदगाव हिमायतनगर या दोन्ही तालुक्याप्रमाणेच हदगांव शहरातील नागरिकांनी देखील मोठ्या अपेक्षेने आमदार बाबुराव कदम यांना प्रचंड मताधिक्याने विजयी केले. नागरिकांनी टाकलेला विश्वास सार्थ ठरवण्याचे आता आमदार बाबुराव कदम यांनी मनावर घेतले असून नागरिकांच्या विश्वासाला तडा न जाऊ देण्यासाठी येणाऱ्या तक्रारींची दखल घेतली आहे. यापूर्वीच्या नेत्यांनी काही विशिष्ट भागातच विकासकामे केली तर काही भागात विकास कामांना डावलले. हदगाव शहराचा समतोल विकास करण्याचा आपला मानस असल्याचे सुद्धा त्यांनी यावेळी जाहीर केले. परंतु आलेला निधी केवळ हडप करण्याचा प्रयत्न कोणी करू नये. याची जबाबदारी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी आणि संबंधित अभियंते यांची असल्यामुळे कोणत्याही कामातील भ्रष्टाचार अनियमितता किंवा निकृष्टता खपवून घेतली जाणार नाही. मुख्याधिकाऱ्यांच्या निर्देशावरून सुद्धा कंत्राटदारांनी मनमानी चालवल्यास अशा एजन्सीची नावे कळ्या यादीत टाकण्याचे सुद्धा आमदार बाबुराव कदम यांनी मुख्याधिकारी यांना सूचना केली आहे.

## देगलूर शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) गटाला मोठा खिंडार

# शिवसेना शहर प्रमुख बालाजी मैलागिरे यांच्या सह असंख्य कार्यकर्ते यांचा भाजपमध्ये प्रवेश

लोकनेता न्यूज नेटवर्क

देगलूर । धनाजी जोशी




देगलूरमध्ये काँग्रेस व शिवसेना उबाठा पक्षाला मोठा धक्का बसला आहे. माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच आमदार जितेश अंतापूरकर यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेससह उबाठा गटाच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी शुक्रवारी सायंकाळी नांदेड येथील कार्यक्रमात भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

मा मुख्यमंत्री अशोक चव्हाण भाजपा मध्ये दाखल झाल्यापासून महाविकास आघाडीतील गळती सुरू झाली होती. त्यांच्या निर्णयामुळे अनेक कार्यकर्ते संभ्रमात होते. दरम्यान, आमदार जितेश अंतापूरकर यांच्या खेळीमुळे मोठ्या संख्येने उबाठा गटाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थक भाजपमध्ये सामीलझाले आहेत. भाजपच्या वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत २८ फेब्रुवारी रोजी पक्षप्रवेश सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. देगलूरचे भाजप आमदार जितेश अंतापूरकर यांनी यावेळी नवा विश्वास आणि नव्या संधीचे स्वागत करत पक्षबांधणीसाठी कटिबद्ध राहण्याचे संकेत दिले. या घडामोडींमुळे देगलूरचे राजकीय समीकरणे झपाट्याने बदलत आहे. भाजपच्या या खेळीमुळे शिवसेना नेतृत्वाला धक्का बसला आहे. जिल्ह्यातील आणखी काही शिवसेनेचे नेते आणि कार्यकर्ते भाजपच्या वाटेवर असल्याचे सांगण्यात येते.शिवसेना शहर प्रमुख बालाजी मैलागिरे हे गेल्या पंधरा वर्षांपासून शिवसेना शहर प्रमुख धुरा सांभाळली असून अनेक आंदोलने मोर्चे त्यांच्या नेतृत्वाखाली झाले असून युवा कार्यकर्त्यांचे संघटन मजबूत असून ग्रागीम भागात त्यांना मानणारा खूप मोठा वर्ग आहे, त्यांच्या भाजपा प्रवेशाने येणाऱ्या नगर परिषद निवडणुकीत भाजपला याचा नक्की फायदा होईल तसेच शिवसेना शहर प्रमुख बालाजी मैलागिरे यांच्यासह विस गाड्याचा ताफ्यासह कार्यकर्ते सोबत आज जाहीर प्रवेश केला असून अजून अनेक कार्यकर्ते संपर्कात असुन त्यांचा सुध्दा भाजपा प्रवेश लवकरच करणार असल्याचे सांगितले.यावेळी महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री राज्यसभेचे खासदार श्री अशोकराव चव्हाण साहेब देगलूर बिलोली विधानसभेचे आमदार जितेश अंतापुरकर भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष श्री संतुकराव हंबर्डे साहेब,देगलूर भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष अनिल पाटील खानापूरकर,शिवाजी देशमुख बळेगावकर,शंकर कंतेवार साहेब,प्रितम देशमुख हाणेगावकर साहेब, जनार्दन बिरादार,प्रशांत दासरवार, दिपक संगमकर,संग्राम देगावकर यांच्या समवेत अनेक नेते पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904